# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय**

रामनगरसृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

**दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१**

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक :- १२६/२०२५ दिनांक :- १७/०३/२०२५.

## मेडीकल असोसिएशनचे वार्षिक कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती कार्यशाळा !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात सामान्य नागरिकांमध्ये सायबर विषयक जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध ठिकाणी सायबर विषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी आदेशित केलेले आहे.

मा. पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेतून दिनांक १६ मार्च २०२५ रोजी सायंकाळी १६.३० वाजता मिरारोड-भाईंदर मेडीकल असोसिएशनचे वार्षिक कार्यक्रमाचे **GCC Club, Auditorium** मिरारोड पुर्व येथे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे निमित्ताने सायबर पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांनी **Cyber Awareness Programm** आयोजन करुन कार्यक्रमाकरीता उपस्थित असलेल्या २० ते ६५ वयोगटातील डॉक्टर व मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलचे २०० प्रतिनिधी यांना सायबर जनजागृतीबाबत खालील विषयांवर सविस्तर माहिती देवून मार्गदर्शन केले.

१) सध्यस्थितीत घडणारे वेगवेगळे सायबर गुन्हे (Trending Cyber Crimes).
२) सोशल मिडीयासंदर्भात घडणारे गुन्हे (Social Media Related crimes/social media etiquette).
३) ऑनलाईन सायबर गुन्हयांस कश्याप्रकारे टाळता येईल याबाबतची माहिती (Precautions to be Taken).
४) ऑनलाईन गुन्हयास बळी पडल्यास तात्काळ कोठे व व कश्याप्रकारे तक्रार नोंदविता येईल याबाबतची माहिती. (Where and How to Complaint ?).

यावेळी २० ते ६५ वयोगटातील एकुण २०० डॉक्टर व मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलचे प्रतिनिधी हजर होते. तसेच सदर कार्यक्रमामध्ये डॉक्टर्स व मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल यांचे वेबसाईट सुरक्षित ठेवण्याबाबत महत्त्वपुर्ण अश्या सुचना देण्यात आल्यात. तसेच सायबर गुन्हे जनजागृतीबाबत पत्रक वाटप करण्यात आली.सदर कार्यक्रमाला डॉक्टर्स व मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलचे प्रतिनिधी यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला, तसेच सदरच्या कार्यक्रमाबाबत सकारात्मक प्रतिक्रीया दिलेल्या आहेत.

सदरचे कार्यक्रमामध्ये भाईंदर मेडीकल असोसिएशनचे अध्यक्षा डॉ. माधवी जाधव व सचिव डॉ. श्री. अमोल जाधव यांनी मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे सायबर पोलीस ठाणेचे पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचे आभार मानले आहे.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, ऑनलाईन फसवणुकीचा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

----


RESERVED
RESERVED




CONTENTS
TRENDING CYBER CRIMES
SAFETY MEASURES
IT ACTS & PUNISHMENT
MBVV
CYBER POLICE STATION
HITANKSHI HOSPITAL
(MULTISPECIALITY HOSPITAL)
HITANKSHI HOSPITAL
(MULTISPECIALITY HOSPITAL)
HITANKSHI HOSPITAL
(MULTISPECIALITY HOSPITAL)
BMA SYMPOSIUM
2025


INSTAGRAM/FB HACKING
FAKE
MBVV
BMA SYMPOSIUM
2025


Bhayandar Medical Association
Presents
BMA SYMPOSIUM 2025
Next Level Legacy
MR. SUJITKUMAR GUNJKAR
SPEAKER
POLICE INSPECTOR
WORKING AT CYBER POLICE
STATION MBVV
SINCE 2021
SINCE-2005
COMPLETE HEALTH CHECKUP
Bhayandar Medical Association
BMA SYMPOSIUM
2025
Next Level Legacy